महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ १८ जून २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३५० ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# कृषि क्षेत्रात परिवर्तन : शेतीसाठी एआय धोरण मंजूर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मत्रिमंडळाची बैठक आज संपन्न झाली. या बैठकीत 10 मोठे निर्णय घेण्यात आले असून राज्यात शेतीसाठी AI धोरणास मंजुरी देण्यात आली आहे. यासह, आणीबाणीच्या काळात तुरुंगवास भोगलेल्या नागरिकांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता महाॲग्री-एआय धोरण 2025 ते 2029 मंजूर करण्यात आलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून कृषि क्षेत्रात परिवर्तन घडविता येणार आहे. त्यामुळे, मत्रिमंडळ बैठकीतील हा निर्णय शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल. यासह, धारावी पुनर्विकास, अनिवासी भारतीयांच्या मुलांच्या शिक्षणाबाबतही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.**

- ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास नाशिक जिल्ह्यातील मौजे जांबुटके येथील २९ हेक्टर ५२ आर जमीन. आदिवासी समाजातील होतकरू उद्योजकांना प्रोत्साहन, रोजगार निर्मिती व आर्थिक विकासास चालना मिळणार.
- एमएमआरडीए आणि मेसर्स रायगड पेण ग्रोथ सेंटर लि. यांच्या संयुक्त प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीवरील मुद्रांक शुल्कात सवलत. सार्वजनिक, खासगी भागिदारीतून हा राज्यातील पहिलाचा मोठा प्रकल्प. ग्रोथ सेंटरमुळे विदेशी गुंतवणूक आकर्षित होणार.
- मुंबईतील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठासाठी आवश्यक मौजे पहाडी गोरेगाव येथील जमिनीच्या हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क माफ.



विद्यापीठाला स्व-मालकीची इमारत मिळणार. हजारो विद्यार्थ्यासाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार.

- धारावी पुनर्विकास प्रकल्पातील विशेष हेतू कंपनी आणि अन्य यंत्रणा दरम्यानच्या भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्क माफ. लोकहितार्थ मोठा प्रकल्प असल्याने, पुनवर्सन व पुनर्विकास योजनेला गती लाभणार. योजनेची अंमलबजावणी सुलभ रीतीने होणार.
- केंद्र सरकारच्या WINDS प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणी करण्यात येणार. यासाठी महावेध प्रकल्पास मुदतवाढ देण्याचा निर्णय. राज्यातील सर्व गावांमध्ये हवामान विषयक अचूक माहिती मिळावी यासाठीचा प्रकल्प. शेतकऱ्यांना हवामानाधारित कृषि विषयक सल्ला व मार्गदर्शनासाठी महत्वाचा प्रकल्प.
- महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता महाॲग्री-एआय धोरण २०२५-२०२९ मंजूर. कृषि क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उद्योन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून परिवर्तन घडविता येणार. कृत्रिम बुद्धीमत्ता, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धीमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ड्रोन, संगणकीय दृष्टीक्षमता, रोबोटिक्स, पूर्वानुमान विश्लेषण यांचा वापर करत, राज्यातील ॲग्रीस्टॅक, महा-ॲग्रीस्टेक, महावेद, क्रॉपसॅप, ॲगमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डिबीटी यांसारखे प्रकल्प पुढे नेण्यास मदत होणार.
- मुंबई मेट्रो मार्ग-२अ, २ब आणि ७ या मेट्रो प्रकल्पांकरिता एशियन डेव्हलपमेंट बँक व न्यू डेव्हलपमेंट बँक यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या कर्जास मुदतवाढ.
- विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्प आता "बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा" या तत्त्वावर हाती घेण्यास मान्यता.
- आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुप्पटीने वाढ. हयात जोडीदारालाही मानधन मिळणार. गौरव योजनेमध्ये सुधारणा.
- अनिवासी भारतीयांच्या मुलांना, पाल्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळणार. विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अनिवासी भारतीयांच्या व्याख्येत बदल. प्रवेश व शुल्क यांचे विनियमन अधिनियम, २०१५ मध्ये सुधारणा.

## थोडक्यात महत्वाचे




## केडीएमसीच्या मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रशासनाकडून नोटीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

रुग्णालय कामकाजात अनेक त्रुटी आढळून आल्याने प्रशासनाने रुक्मिणीबाई रुग्णालय, शास्त्रीनगर रुग्णालय आणि वसंत व्हॅली रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना शिस्तभंग कारवाईची नोटीस बजावली आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाचे उपायुक्त प्रसाद बोरकर यांनी ही नोटीस बजावली आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेची कल्याणमधील रुक्मिणीबाई व वसंत व्हॅली तसेच डोंबिवलीत शास्त्रीनगर अशी तीन रुग्णालये आहेत. अलिकडेच पालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांनी पालिकेतील रुग्णालयांची अचानक भेट घेत पाहणी केली. त्या वेळी कल्याणच्या रुक्मिणीबाई रुग्णालयातील आरोग्य विभागाचा कारभार अतिशय ढिसाळ असल्याचे पालिका आयुक्त गोयल यांच्या निदर्शनास आले.

तेव्हापासून त्यांनी आरोग्य विभागावर आपली करडी नजर ठेवली आहे. आरोग्य विभागाच्या कामकाजात शिस्त आणण्यासाठी आयुक्तांनी पालिका मुख्यालयात अनेक वर्षे ठाण मांडून असलेल्या, रुग्णसेवेऐवजी पालिका मुख्यालयात भित्तीपत्रके, जनजागृती पत्रके छापणे, निविदा, नूतनीकरणाची प्रकरणे हाताळण्यात रस असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. आयुक्त गोयल यांना मिळालेल्या माहितीनुसार गेल्या आठवड्यात अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, वैद्यकीय आरोग्य विभागाचे उपायुक्त प्रसाद बोरकर यांनी रुक्मिणीबाई, शास्त्रीनगर व वसंत व्हॅली रुग्णालयांना भेटी दिल्या. दोन्ही अधिकाऱ्यांनी साध्या वेशात रुग्णालयात दाखल होत कामकाजाची पाहणी केली. या दोन्ही अधिकाऱ्यांनी रुग्णालयाच्या प्रत्येक रुग्ण कक्षात जाऊन पाहणी केली. त्यांना रात्रपाळीतील कर्तव्यावरील कर्मचारी हे बाह्यस्रोत विभागातील असल्याचे समजले. यामध्ये एकही पालिकेच्या आस्थापनेवरील कायमस्वरूपी कर्मचारी नव्हता. रुग्णालयात आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली तरी बाह्यस्रोत कर्मचारी तत्काळ निर्णय घेऊ शकत नाहीत. त्यामुळे अडचणी येण्याची शक्यता असते, हे माहिती असूनही रात्रपाळीत बाह्यस्रोत कर्मचारी कर्तव्यावर ठेवल्याने अधिकाऱ्यांनी आक्षेप घेतला.

अपघात विभागात कर्तव्य असलेले वैद्यकीय अधिकारी हजर नव्हते. ही गंभीर बाब अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आली. रुग्णालयात महिला रुग्ण, कर्मचारी असतात. हे पाहता रुग्णालयातील विकी तेजा हा कर्मचारी अर्ध्या विजारीवर रुग्णालयात रात्रपाळीत उपस्थित होता. कार्यालयीन शिस्तीचा विचार करता हा गंभीर विषय असल्याचे मत अधिकाऱ्यांनी नोंदवले. याप्रकरणी उपायुक्त बोरकर यांनी रुक्मिणीबाई रुग्णालयाच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शोभना लावणकर, शास्त्रीनगर रुग्णालयाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. योगेश चौधरी, वसंत व्हॅली रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सपना रामोळे यांना कर्तव्यात कसून केल्याप्रकरणी नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

## आज आणि उद्या १२ तासांचा शटडाऊन ठाण्यात पाणीबाणीची स्थिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ऐन पावसाळ्यात ठाणे शहरात पाणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली असून 18 आणि 19 जून या दोन दिवसांमध्ये स्टेम प्राधिकरणाकडून तब्बल 12 तासांचा शटडाऊन घेतला जाणार आहे. अत्यावश्यक दुरुस्तीसाठी हा शटडाऊन घेण्यात येणार असून त्यामुळे ठाण्यातील काही महत्वाच्या भागांचा पाणीपुरवठा 12 तास बंद राहणार असल्याने ऐन पावसाळ्यात ठाणेकरांना पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागणार आहेत.

ठाणे महानगरपालिकेला स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणीपुरवठा अत्यावश्यक दुरुस्ती कामामुळे 18 जून रोजी सकाळी 9 ते रात्री 9 वाजेपर्यंत हा पाणीपुरवठा बंद रहाणार आहे. या काळात, ठाणे महानगरपालिकेच्या स्वतःच्या पाणी पुरवठा योजनेचे व्यवस्थापन करुन टप्प्याटप्प्याने ठाणे शहरात एक वेळ पाणीपुरवठा सुरू ठेवण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यानुसार, घोडबंदर रोड, पातलीपाडा, पवार नगर, कोठारी कम्पाउंड, आझाद नगर, डोंगरीपाडा, वाघबीळ, आनंद नगर, कासारवडवली, ओवळा इत्यादी ठिकाणाचा पाणी पुरवठा गुरुवार 19 जून रोजी सकाळी 9 ते रात्री 9 वाजेपर्यंत बंद राहणार आहे. तसेच, समता नगर, ऋतु पार्क, सिध्देश्वर, ईटरनिटी, जॉन्सन, जेल, साकेत, उथळसर, रेतीबंदर, कळवा व मुंब्रा येथील काही भागांचा पाणीपुरवठा रात्री 9 ते 20 जून रोजी सकाळी 9 वाजेपर्यंत बंद राहणार आहे. नागरिकांची अडचण होऊ नये यासाठी टप्याटप्याने एक वेळ पाणीपुरवठा सुरू ठेवण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती पालिका प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

# खंडित वीजपुरवठ्यामुळे अंबरनाथ नगर परिषद अंधारात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
अंबरनाथ: ता. १७

अंबरनाथ नगरपालिकेच्या नव्या कोऱ्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरच्या एका दालनात अचानक पाणी साचल्याने पूर्ण दिवस वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे पालिकेच्या पहिल्या मजल्यावर सर्वत्र अंधार पसरल्याचे पाहायला मिळाले. विजच नसल्याने संगणक बंद पडले होते, शासकीय कामकाजही ठप्प झाले. दरम्यान, याची माहिती अधिकाऱ्यांना मिळताच तातडीने वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम हाती घेण्यात आले. युद्धपातळीवर काम सुरू करण्यात आले आहे.

अंबरनाथ नगरपालिकेच्या पहिल्या मजल्यावर उपमुख्याधिकारी यांचे दालन आहे. पूर्वी याच दालनातून उपमुख्याधिकारी उमेश राऊत यांचे कामकाज चालायचे; मात्र काही महिन्यांपूर्वीच त्यांचे हे दालन बदलण्यात आले. त्यामुळे अनेक महिन्यांपासून हे दालन बंद आहे. मात्र, मंगळवारी सकाळी या बंद दालनात अचानक पाणी साचल्याने पालिकेत गोंधळ उडाला. उपस्थित कर्मचाऱ्यांनी तत्काळ याची माहिती उपमुख्याधिकारी राऊत व शहर अभियंता राजेश तडवी यांना दिली. या ठिकाणची पाहणी करून पहिल्या मजल्यावरील वीजपुरवठा खंडित करण्यात आला. दालनात साचलेला पाण्याचा निचरा करण्यात आला आहे. पालिकेतील वीजपुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी युद्धपातळीवर काम सुरू आहे. बंद दालनात शौचालयाच्या भिंतीलगतच्या वाहिनीमधून पाणी आल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. हे पाणी शौचालयाच्या भिंतीतून दालनातील फरशीवर पसरल्याने विद्युत वाहिनीसाठी केलेल्या खड्ड्यात पाणी मोठ्या प्रमाणात साचले होते. या खड्ड्यात अनेक वाहिन्यांचा गुथा असल्याने शॉर्टसर्किट होऊ नये, यासाठी मजल्यावरील वीजपुरवठा खंडित करण्यात आला. पुढील दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले. याचा सर्व परिणाम पालिकेच्या कामकाजावर झालेला आहे. पूर्ण दिवस वीजच नसल्याने पहिल्या मजल्यावरचे सर्व संगणक बंद पडलेले होते. शासकीय कामकाजही ठप्प झाले होते. एकच वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या प्रशासकीय इमारतीच्या पहिल्या मजल्याच्या या दालनात पाणी कसे साचले? असा प्रश्न आता नागरिक उपस्थित करत आहेत.




## कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक ६८ अर्ज माघारी

**न्यायालयाच्या आदेशानंतर प्रसिद्ध होणार उमेदवारांची अंतिम यादी**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** राजकीय पक्षाच्या रंगीत तालीम म्हणून पाहिल्या जाणर्या कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या २१ जून रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी ७२ उमेदवार रिंगणात आहेत. मात्र कागदपत्र अपुरे असल्याचे कारण देत अर्ज बाद केलेल्या एका उमेदवाराला न्यायालयाने निवडणूक लढविण्याची परवानगी दिल्याची चर्चा असून न्यायालयाचा आदेशाची प्रत मिळाल्याखेरीज अंतिम यादी प्रसिद्ध करता येत नसल्याने उद्या अंतिम यादी प्रसिद्ध केली जाणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी विशाल जाधवर यांनी सांगितले.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १८ जागांसाठी १५६ उमेदवाराकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. यातील १६ अर्ज बाद झाले होते. अनेक उमेदवारांनी एकापेक्षा जास्त अर्ज दाखल केल्याने ९९ उमेदवारांचे १४० अर्ज होते.

आज उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या अखेरच्या दिवशी ६८ अर्ज माघारी घेण्यात आल्याने ७२ उमेदवार रिंगणात आहेत. मात्र याच वेळी कागदपत्र अपुरे असल्याचे कारण देत अर्ज बाद करण्यात आलेल्या उमेदवारापैकी चार ते पाच उमेदवारांनी न्यायालयात धाव घेतली होती. यातील एका उमेदवाराचे कागदपत्र ग्राह्य धरत न्यायलयाने त्याला निवडणूक लढविण्याची परवानगी दिल्याचे सांगितले जात आहे. मात्र अर्ज माघारी घेण्याची वेळ उलटल्यानंतरही न्यायालयाच्या ऑर्डरची प्रत निवडणूक निर्णय अधिकार्यांना प्राप्त झालेली नसल्याने उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात आलेली नसून उद्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करून त्याच वेळी उमेदवारांना चिन्हाचे वाटप देखील केले जाणार आहे.

यामुळे उद्यापासून पुढील १० दिवस प्रचाराचा चांगलाच जोर चढणार आहे. बाजार समितीची निवडणूक देखील राजकीय पक्षांनी प्रतिष्ठेची केल्याने या निवडणुकीत देखील मतांचा घोडेबाजार रंगण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्ष देखील आपली ताकद पणाला लावून आपले उमेदवार जिंकून आण्यासाठी खेळी खेळत असल्याचे राजकीय जाणकारांचे मत असल्याचे दिसत आहे.

# बदलापूर बारवी रस्त्याच्या कॉँक्रिटीकरणामुळे स्थानिक ग्रामस्थांची कसरत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : बदलापूर मुरबाड रस्त्यावर बारवी धरणापर्यंतच्या पट्ट्यात विविध ठिकाणीकॉँक्रिटी करणाच्या कामाला सुरूवात झाली आहे. त्यामुळे या मार्गावरची मुळगावमार्गे होणारी वाहतूक बोराडपाडा रस्त्यावरून होते आहे. पावसाळी पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांनी या रस्त्याने प्रवास टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सध्या येथून वाहतूक करताना स्थानिक ग्रामस्थांना मोठी कसरत करावी लागते आहे. पिंपळोली भागात सुरू असलेल्या खोदकामामुळे अपघाताचीही भीती व्यक्त होते आहे.

अंबरनाथ आणि मुरबाड तालुक्यांच्या वेशीवर असलेले बारवी धरण आणि त्याचा परिसर हा पावसाळी पर्यटनासाठी महत्वाचा आहे. अनेक पर्यटक या रस्त्यावर निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी येत असतात. या पर्यटकांसाठी बदलापूर मुरबाड हा बारवी धरणामार्गे जाणारा रस्ता महत्वाचा आहे. तसेच मुरबाड तालुक्यातील अनेक गावे, अंबरनाथ तालुक्यातील गावांतील ग्रामस्थांसाठी बदलापूर आणि आसपासच्या शहरात येजा करण्यासाठी हा मार्ग फायद्याचा आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून या मार्गावर रस्ता कॉँक्रिटीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. या रस्त्यावर राहटोली ते मुळगाव, पुढे सोनावळेपर्यंत आणि बारवी धरणाच्या जवळ पिंपोळी ते धरण या पट्ट्यात कॉँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे.









# आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या ऑफलाईन सत्राच्या कार्यक्रमाचे उद्घाटन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /बदलापूर ; आंतरराष्ट्रीय योग दिवस २०२५ च्या ५० दिवसांच्या काउंटडाउन कार्यक्रमाच्या ऑफलाईन सत्राच्या भव्य उद्घाटनाचा कार्यक्रम आज दि. १५ जून २०२५ रोजी काटदरे हॉल, बदलापूर (पूर्व) व अजयराजा हॉल, बदलापूर (पश्चिम) अशा दोन्ही ठिकाणी संपन्न झाला. या कार्यक्रमास मा. आमदार श्री. किसनजी कथोरे , पोलीस उप आयुक्त मा. श्री.सचिनजी गोरे व सहाय्यक पोलीस आयुक्त मा. श्री. आयुक्त शैलेशजी काळे यांची विशेष उपस्थिती होती. बदलापूरमधील मान्यवर नगरसेवकांनी ही या कार्यक्रमास उपस्थिती लावली. बदलापूर पूर्व येथे शहर अध्यक्ष श्री. रमेश सोळसे तर बदलापूर पश्चिम येथे श्री. किरण भोईर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

हा कार्यक्रम दि. ३ मे पासून ऑनलाईन पध्दतीने हा कार्यक्रम सुरु झाला आहे. आदरणीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री माननीय श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. राज्य एनएसएस संपर्क अधिकारी डॉ. निलेश पाठक यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली, मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने, आरोग्य योगा आणि नॅचरोपॅथी इन्स्टिट्यूट, जीवन फाउंडेशन यांच्या सहकार्याने तसेच जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या आणि एसएसटी कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या साथीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

योगाच्या प्रत्येक कार्यक्रमास मोलाचा पाठिंबा असतो तो म्हणजे सन्माननीय आमदार श्री. किसनजी कथोरे साहेब यांचा. त्यांचे दृढ समर्थन, दूरदर्शी नेतृत्व आणि आरोग्य व युवा विकासाच्या प्रति वचनबध्दता, योग प्रचार कार्यक्रमांसाठी एक शक्तिस्तंभ ठरली आहे. या सर्व योग कार्यक्रमाचे नेतृत्व करणारे व ही योग चळवळ उभी रहावी व प्रत्येक व्यक्तीपर्यर्ंत, आबाल-वृध्दांपर्यर्ंत योगाचे फायदे पाहोचावे, केवळ शारीरिक नाही तर बौध्दिक, मानसिक, भावनिक सर्वच स्तरावंर योग कसा उपयुक्त आहे हे कळावे यासाठी, योगाचे शास्त्रीय ज्ञान घरोघरी पाहोचावे यासाठी अथक अर्थात न थकता प्रयत्न करणारे, शैक्षणिक संस्था, योग संस्था आणि स्थानिका घटकांना एकत्र करुन उपक्रम करणारे डॉ. विजय कुकरेजा सर यांच्याबद्दल बोलू तेवढे कमीच आहे. योग घराघरांत पोहोचविण्याचे शिवधनुष्य त्यांनी पेलले आहे. आणि त्यात ते यशस्वीदेखील होत आहे हे खरंच कौतुकास्पद आहे.या कार्यक्रमात आमच्या सहयोगी संस्था आहेत.

महाराष्ट्र योगशिक्षक संघ, द योगा, आशा फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट, सहकार भारती, सोसायटी प्रो, जन्मदा नेत्र व वैद्यकीय फाउंडेशन उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या सहकार्याने हि मोहीम योगास केवळ शारीरिक व्यायाम म्हणून नव्हे, तर जीवनशैली, तत्वज्ञान आणि आपल्या सांस्कृतिक परंपरेचा अभिमान म्हणून आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्याचा संकल्प आहे.

आणि यास एका नवीन अभियानाची जोड दिली आहे ती म्हणजे "शिविमुक्त अभियान'. शब्दांची ताकद सर्वज्ञात आहे. समाजातील या नकारात्मक शब्दांना हद्दपार करण्यासाठी या अभियानाची आज किती गरज आहे वेगळे सांगण्याची गरज नाही.

योग्य म्हणजे फक्त आसने नव्हे, तर एकत्व, संतुलन, आत्मनियंत्रण आणि सखोल जागरूकता आहे. आणि हेच आपण या ५० दिवसांच्या काउंटडाउन कार्यक्रमात महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात पोहोचवण्याचा प्रयत्न करीत आहोत. आणि त्यासाठी ३ मे ते २१ जूनपर्यंत आरोग्य योग त्रिनेत्र इन्साईट या youtube चॅनेल वरून रोज रात्री ८ ते ९ या वेळेत विविध योग्य विषयांवर ऑनलाईन व्याख्यानमाला सुरु आहे. तसेच आयुष्य मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरून सामान्य योग प्रोटोकॉलच्या मोफत योग सत्रांचे आयोजन मुंबई, पुणे, नाशिक, सातारा, रायगड, ठाणे आणि आपल्या शहरासह इतर अनेक शहरांमध्ये करण्यात आले आहे. हि सत्रे मोफत आणि सर्वांसाठी खुली आहेत.

योग प्रत्येकापर्यंत पोहोचावा यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करूया . आणि त्यासाठी प्रत्येक वॉर्डमध्ये YCC म्हणजेच योगा कम्युनिटी क्लबची स्थापना करण्याचा मानस मा. आमदार श्री. किसनजी कथोरे साहेब यांचा हाये. हा केवळ एक कार्यक्रम नाही तर हा एक सामूहिक संकल्प आहे, उत्तम जीवन जगण्याचा, सखोल विचार करण्याचा आणि आपल्या भारतीय परंपरेत खोलवर रुजण्याचा . तरी सर्वांना आवाहन आहे कि दि. १६ जून ते २१ जूनपर्यंत वरील दोन्ही ठिकाणी रोज सकाळी मोफत योग सत्रांना आपण मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. चला तर मग आपण सर्वांनी एकत्र येऊन या योग चळवळीस यशस्वी बनवूया.

# पिसवली जिल्हा परिषद शाळेला आ. राजेश मोरे यांची मदत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : वीज बिल थकल्याने कल्याण ग्रामीण मधील पिसवली जिल्हा परिषद शाळेचा वीज पुरवठा खंडित करण्यात आल्याची बाब कळताच शाळेतील अंधार दूर करण्यासाठी आमदार राजेश मोरे यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार तातडीने थकलेल्या वीज बिलाचा भरणा करत वीज पुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना महावितरणच्या अधिकार्यांना दिल्या. तर शाळेत विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, इमारतीची रंगरंगोटी दुरुस्ती, वर्गखोल्यामध्ये पंखे, विजेचे दिवे, शालेय कपाटे यासारखे शैक्षणिक साहित्यासाठी तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून देत आमदार मोरे यांनी आपल्या मतदार संघाबद्दल असलेली आत्मीयता दाखवून दिली.

ग्रामीण भाग पालिकेत आणि पालिकेबाहेर यासारख्या चर्चा रंगविणार्यावर काही जणाचा भर असताना या भागाचे आमदार म्हणून राजेश मोरे यांनी कायमच मतदार संघात फिरून नागरिकाच्या समस्या जाणून घेण्या बरोबरच त्या सोडविण्याला कायमच प्राधान्य दिले आहे. १०० शाळांना भेटी या उपक्रमा अंतर्गत शाळेच्या पहिल्या दिवसापासून मतदार संघातील शाळा मध्ये फिरून या शाळांच्या समस्या जाणून घेत त्या सोडविण्यावर आमदार राजेश मोरे यांनी भर दिला आहे. याचाच भाग म्हणून आज जिल्हा परिषदेच्या पिसवली शाळेत आमदार मोरे यांनी भेट दिली असता या शाळेत अंधार असल्याचे पाहून त्यांनी जाब विचारला असता शाळेचे ४० हजार इतके वीज बिल थकल्याने महावितरण कडून वीज पुरवठा खंडित करण्यात आल्याची बाब शिक्षकांनी आमदार राजेश मोरे यांच्या निदर्शनास आणून दिली. यानंतर त्यांनी तत्काळ खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना याबाबतची माहिती देत आमदार मोरे यांनी थकलेल्या वीज बिलाची रक्कम शिक्षकांना सुपूर्द करत वीज बिल भरणा करण्याचे आदेश दिले तर महावितरण च्या अधिकार्यांना तत्काळ शाळेचा वीज पुरवठा सुरु करण्याच्या सूचना केल्या. तर शाळेतील शिक्षकांनी शाळेच्या इमारतीच्या तातडीच्या दुरुस्तीची किंवा नूतनीकरणाची गरज असल्याचे तसेच शाळेची संरक्षक भिंत धोकादायक बनली असून ती कोसळल्यास दुर्घटना होण्याची भीती व्यक्त केली. याचबरोबर ध्वजाचा अज्ञातांनी कापून नेलेला खांब, पिण्याच्या पाण्याची आणि स्वच्छतागृहाची अनुपलब्धता वर्गखोल्याची रंगरंगोटी तसेच टेबल खुर्च्या, शालेय कपाटे, पंखे आणि विजेचे दिवे यासारखे साहित्य देखील शाळेसाठी आवश्यक असल्याची मागणी शिक्षकांनी आमदार मोरे यांच्याकडे केली. यानंतर आमदार ज्या गोष्टी तातडीने उपलब्ध करून देणे शक्य आहेत त्या वस्तूच्या तातडीने खरेदीसाठी आमदार मोरे यांनी निधी देखील उपलब्ध करून दिल्याने शिक्षकांनी आमदार मोरे यांना धन्यवाद दिले आहेत. तसेच संरक्षक भिंतीसह शाळेच्या दुरुस्तीबाबत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून प्रयत्न करण्याचे आश्वासन देखील आमदार मोरे यांनी दिल्याने शिक्षकांनी आमदार मोरे यांना धन्यवाद दिले आहेत.

### अवैध रेती वाहतूक प्रकरणी

# दोन बार्ज जाळून केले नष्ट

## महसूल विभागाची कारवाई



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता कल्याण : कल्याण रेती बंदर परिसरात अवैध रेती वाहतूक प्रकरणी महसूल विभागाने दोन बार्ज सोमवारी रात्री जाळून नष्ट केल्या. 16 जून रोजी कल्याण येथील रेती बंदराजवळ अवैध वाहतूक होत असल्याबाबत व्हिडिओ वायरल झाला होता. या अनुषंगाने मंडळ अधिकारी कल्याण व मंडळातील सर्व तलाठी यांच्या पथकाने रेतीबंदराजवळ अवैध वाहतूक करणाऱ्या दोन बार्ज वर कार्यवाही करण्यात आली. यामध्ये दोन्ही बार्ज जाळून नष्ट करण्यात आलेले आसल्याची माहिती कल्याण तहसीलदार सचिन शेजाळ यांनी दिली.

### बालक मंदिर संस्थेच्या पूर्व प्राथमिक मराठी विभागात

# विद्यार्थ्यांचे पारंपारिक स्वागत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : कल्याण पश्चिमेतील बालक मंदिर संस्थेच्या पूर्व प्राथमिक मराठी विभागाच्या शालेय वर्षाची सुरुवात अत्यंत दिमाखात सोमवारी झाली. शाळेची सजावट केळीचे खांब, झेंडूची तोरण, रांगोळ्या, फुलांच्या पायघड्या घालून व औक्षण करून मुलांचे स्वागत केले. प्रवेश उत्सवाची सुरुवात समितीच्या निमंत्रित सदस्या सी एस वृषाली जोशी, मुख्याध्यापिका अनुजा पेठे तसेच कॉर्डिनेटर गौरी रानडे यांच्या हस्ते या कार्यक्रमाची सुरुवात झाली. नंतर पालकांनी श्रीफळ वाढवून व नर्सरीच्या मुलांच्या हस्ते रिबन कापून केली. मुलांचे औक्षण अनुजा पेठे यांनी केले. वृषाली यांनी गुलाब देऊन तर गौरी यांनी मुलांना भिंगरी देऊन त्यांचे स्वागत केले. यशश्री, अलका, वनिता व अस्मिता यांनी फुलांच्या पाकळयांचा वर्षाव करून मुला मुलींचे वर्गात पदार्पण करून घेतले. मुलांना खाऊ म्हणून बिस्कीटचे पुडे देण्यात आले. हे सर्व बघून मुलांना खूपच आनंद झाला. सर्व शिक्षिका व शिक्षिकेतर कर्मचारी यांनी सर्व मुलांचे मनापासून स्वागत केले. हे सर्व बघून पालकांनी मुख्याध्यापिका शिक्षिका व सेविकांचे खूप कौतुक केले.

# गीतासार



## अध्याय १३
## क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगः

अनादित्वा न्निर्गुणत्वा त्परमात्माय मव्ययः । शरीरस्थोऽपि कौन्तेय न करोति न लिप्यते ॥ १३-३१ ॥

हे कौंतेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), हा अविनाशी परमात्मा अनादी आणि निर्गुण असल्यामुळे शरीरात राहात असूनही वास्तविक तो काही करीत नाही आणि लिप्त होत नाही. ॥ १३-३१ ॥

यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते । सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ॥ १३-३२ ॥

ज्याप्रमाणे सर्वत्र व्यापलेले आकाश सूक्ष्म असल्याकारणाने लिप्त होत नाही त्याचप्रमाणे देहात सर्वत्र व्यापून असलेला आत्मा निर्गुण असल्याकारणाने देहाच्या गुणांनी लिप्त होत नाही. ॥ १३-३२ ॥

यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः । क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ॥ १३-३३ ॥

हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), ज्याप्रमाणे एकच सूर्य या संपूर्ण ब्रह्मांडाला प्रकाशित करतो, त्याचप्रमाणे एकच आत्मा संपूर्ण क्षेत्राला प्रकाशित करतो. ॥ १३-३३ ॥

क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा । भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम् ॥ १३-३४ ॥

अशा प्रकारे क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांतील भेद तसेच कार्यासह प्रकृतीपासून मुक्त होण्याचा मार्ग ज्ञानदृष्टीने जे पुरुष तत्त्वतः जाणतात, ते महात्मे परब्रह्म परमात्म्याला प्राप्त होतात. ॥ १३-३४ ॥

## आरोग्य

# चांगल्या आरोग्यासाठी चांगली झोप घेणे आवश्यक



**स्वच्छ बेड**

जे लोक दररोज त्यांचे बेड स्वच्छ करतात त्यांना चांगली झोप लागण्याची आणि त्यांचे आरोग्य चांगले राहण्याची शक्यता 19 टक्के जास्त असते.घाणेरड्या खोलीत झोपल्याने चिंता वाढते.

**स्वच्छ चादर घाला**

दर आठवड्यात उशांचे कव्हर, चादरी धुवून घ्या.तुम्हाला दमा, एक्झिमा किंवा धुळीच्या कणांची ऍलर्जी असेल तर याची विशेष काळजी घ्या. यामुळे तुम्हाला चांगली झोप येईल.

**मोबाईल फोन वापरू नका.**

संशोधनातून असे आढळून आले आहे की झोपण्यापूर्वी निळ्या प्रकाशाच्या संपर्कात आल्याने तुमची झोप बिघडते. म्हणून, झोपण्यापूर्वी सुमारे एक ते दीड तास मोबाईल फोन आणि लॅपटॉपपासून दूर रहा.

**दिवसा कमी झोपा**

दिवसा जास्त झोप घेतल्याने रात्रीच्या झोपेत अडथळा येऊ शकतो, म्हणून जर तुम्हाला दिवसा आळस किंवा झोप येत असेल तर एका तासापेक्षा जास्त झोपू नका. असं केल्याने तुम्हाला रात्री चांगली झोप येईल.

**शारीरिक हालचाली वाढवा:**

दररोज शारीरिक हालचाली केल्याने चांगली झोप येऊ शकते. परंतु झोपण्यापूर्वी जड हालचाली टाळा हे लक्षात ठेवा.

# उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती निर्मला कुचिक यांची शाळेला भेट



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /पेण : शाळेच्या प्रवेशद्वारावर लावण्यातआलेले स्वागत फलक, विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देत शाळेत स्वागत करणारे शिक्षक, पाठ्यपुस्तकांचे करण्यात आलेले वाटप, चिमुकल्या विद्यार्थ्यांचे शाळेत मन रमण्यासाठी ठेवण्यात आलेली विविध खेळणीअशा उत्साहपूर्ण वातावरणातही चिमुकल्यांची किलबिल पाहता पेण तालुक्यातील रावे येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती निर्मला कुचिक यांची प्रवेशोत्सवासाठी भेट दिली आणि शिक्षक पालक व विद्यार्थ्यांमध्ये उत्साह वाढला.

यावेळी वरिष्ठ विस्तार अधिकारी अरूणा देवी मोरे केंद्रप्रमुख केंद्र जोहे व कोपर प्रमोद पाटील,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रावे धनंजय पाटील ,सदस्य गुरुनाथ पाटील, सदस्य सचिन पाटील माजी ग्रामपंचायत सदस्य नवनाथ पाटील माजी सदस्या अनिता पाटील मुख्याध्यापिका अनुसया म्हात्रे , शिक्षक सुनील पाटील, विशाल खाडे, स्नेहा कोळी, प्रतिभा पाटील, राजश्री लोटके तसेच ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रायते पिंपळोली ग्रामपंचायत ठरणार ठाणे जिल्ह्यात पहिली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : ही आवडते मज मनापासूनी शाळा लाविते लळा जशी माऊली बाळा या ग.दि. मा.च्या काव्यपक्तींचा अनुभव घेत मुरबाड -कल्याण या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा रायते येथील नवागतांचा प्रवेशोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. मुले, त्यांचे पालक, गृप.ग्रामपंचायत रायते-पिंपळोलीच्या आदर्श सरपंच राज्य पुरस्कार प्राप्त सरपंच.समिता सुरोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत व महिला वर्गाच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी वर्षाऋतूचे आगमन ढोल ताशाच्या गजरात व बुगुलच्या आवाजाने गावातून मुलांची शोभा यात्रा काढण्यात आली. तत्पूर्वी सौ.अर्चना राठोड मॅडमनी मुलांचे चेहरे रंगवून त्यांच्या कडे सर्वांना आकर्षित केले. अंगणवाडी सुनंदा पवार व जाधव , शाळेच्या मुख्याध्यापिका चारूशीला बोंडे यांनी मुलांचे पहिले पाऊल व औक्षण केले. सिमा जाधव यांनी सर्वांना खिळवून ठेवणारे सुत्रसंचलन केले. अर्चना राठोड , सिमा जाधव यांनी मुलांमध्ये राहून वर्ग सजावट केली.शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.चारूशिला बोंडे यांनी पालकांना मुलांचे भवितव्य फक्त जिल्हा परिषद शाळाच घडवते. आम्ही माणुस घडवतो, मुलांमध्ये मूल्याची रुजवणुक व प्रेमभावना निर्माण करण्यासाठी शाश्वती दिली. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पालकांनी आमच्या मुलांना माणूस म्हणून व विविध कौशल्यात प्राविण्य मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली गृ.ग्रा.पंचायत रायते-पिंपळोली चे माजी सरपंच संतोष सुरोशी यांनी मुलांचे भवितव्य जिल्हा परिषद शाळांमध्ये घडते, आपल्या जिल्ह्याचे शाळेचे अनेक विद्यार्थी आपल्या शाळेने अनेक डॉक्टर, इंजिनिअर, अधिकारी, शिक्षक,ग्रामसेवक पोस्टमन,सैन्य, पोलीस व पोलीस अधिकारी व आदर्श शेतकरी व राजकारणी व समाजधुरीन निर्माण केले. सर्व बालकांना हार्दिक शुभेच्छा .

यानंतर कार्यक्रमाचाच्या अध्यक्षा सरपंच समिता सुरोशी यांनी मुलांना मोबाइल पासून दूर ठेवा, संगणक ज्ञान जरूर द्या पण यंत्र बणू नका असा कानमंत्र दिला. तसेच गृ.ग्रा. पंचायत रायते-पिंपळोली च्या आदर्श सरपंच राज्य पुरस्कार प्राप्त सरपंच समिता सुरोशी यांनी ठाणे जिल्ह्यातील रायते पिंपळोली गृप.ग्रा.पंचायत हि ठाणे जिल्ह्यातील पहिली ग्रामपंचायत असेल कि तिने ऐक स्तुत्य असा चांगला उपक्रम राबवला कि रायते-पिंपळोली गावातील जे पालक आपल्या पाल्यांचे प्रवेश जिल्हा परिषद शाळेतच घेतील त्यांची घरपट्टी (मालमत्ता कर) पुर्णता माफ करण्यात येईल असे जाहीर आवाहन केले व तसा ठराव ग्रामपंचायतीत पारित केला, यावेळी पाठ्यपुस्तके व वह्या वाटप, गणवेश वाटप व शुज व सॉक्स वाटप तसेच वाटरबॉटल, गुड्डे पुडा व चॉकलेट, पेन्सिल वाटप कार्यक्रम झाला. यावेळी माजी उपसरपंच हरेश पवार, शालेय व्यवस्थापन कमिटीच्या अध्यक्षा, उपाध्यक्षा, सदस्य तसेच अनेक ग्रामस्थ उपस्थित होते यानंतर सर्वांचे आभार राठोड यांनी मानले.



## आजचे राशिभविष्य

**मेष**

तुमची आर्थिक बाजू मजबूत असेल. आज, एखाद्या विशिष्ट कार्यासाठी चालू असलेल्या प्रयत्नांचे चांगले परिणाम मिळतील. तुम्हाला समाधान मिळेल.

**वृषभ**

तुमच्या तत्त्वांशी कोणत्याही प्रकारची तडजोड करणार नाही. आज तुमचा समाजात योग्य सन्मान राहील.तुमच्या जागरुकतेमुळे आत्मविश्वास वाढेल.

**मिथुन**

कोणतेही प्रलंबित किंवा उधारलेले पैसे परत मिळू शकतात. कोणत्याही परिस्थितीत घाबरून जाण्याऐवजी त्यावर उपाय शोधा.

**कर्क**

तुमच्या करिअरबद्दल थोडे गोंधळलेले असाल. तुम्ही तुमच्या गुरूकडून करिअरचा सल्ला घेऊ शकता. कामात गुंतागुंत निर्माण होईल.

**सिंह**

तुम्हाला जे आवडते ते करण्यात वेळ घालवा. यामुळे तुम्हाला शांती आणि ऊर्जा मिळेल. त्याचे काम अतिशय काळजीपूर्वक आणि कार्यक्षमतेने करेल.

**कन्या**

मुलांकडून आनंद मिळेल. आज केलेल्या परिश्रमाचे भविष्यात चांगले फळ मिळणार आहे. वैवाहिक जीवनात सुख-शांती राहील.

**तूळ**

अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना चांगल्या नोकरीच्या ऑफर मिळू शकतात. दाखविण्याच्या प्रवृत्तीमुळे तुम्ही अनावश्यक गोष्टींवर पैसे खर्च करू शकता.

**वृश्चिक**

तुमच्या बजेटकडे दुर्लक्ष करू नका, अन्यथा तुम्ही अडचणीत याल. आज बोलताना योग्य शब्द वापरल्यास नात्यात गोडवा कायम राहील.

**धनु**

व्यवसायात मोठी रक्कम मिळू शकते. तुम्हाला याचा फायदा होऊ शकतो. एखादी चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे. अपेक्षा पूर्ण होतील .

**मकर**

आवडत्या कार्यात रस राहील. आज तुम्हाला आनंद वाटेल.तुम्हाला काहीतरी नवीन शिकायला मिळेल. आज आर्थिक बाजू पूर्वीपेक्षा मजबूत होईल.

**कुंभ**

आज एखादी चांगली बातमी मिळाल्याने तुमचे मन प्रसन्न होईल. आज तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत खरेदी इत्यादीमध्येही चांगला वेळ घालवाल.

**मीन**

आगामी काळात तुमच्या महत्त्वाकांक्षाही वाढू शकतात. तुमच्या बोलण्याने सगळे प्रभावित होतील. आजचा दिवस मित्रांसोबत घालवला जाईल.







# केडीएमसीच्या शाळा क्रमांक ८२ च्या नवीन इमारतीचे भुमिपूजन

## आमदार रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते कामाला सुरवात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवली पूर्वेतील ब्राह्मणसभा हॉल मागे असलेल्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या डोंबिवली पूर्वेतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कडोमपा शाळा क्र.८२ या शाळेच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन सोहळा आमदार रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी महापालिकेचे माजी पदाधिकारी, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, शहर अभियंता अनिता परदेशी, उप आयुक्त प्रसाद बोरकर, शिक्षण विभागाचे कार्यकारी अभियंता योगेंद्र राठोड, शिक्षणाधिकारी विजय सरकटे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.




शाळेची नवीन इमारत तळ + 3 मजली असणार असून, यामध्ये 13 वर्ग खोल्या, 1 हॉल, 1 प्रिन्सिपल रूम, 1 ॲडमिन रूम अशा सुविधा उपलब्ध असणार आहेत. यासाठी 116.70लाख शासन निधी, 378.24 लाख महापालिका निधी असे एकूण 494.94 लाख रुपयांची तरतूद महापालिकेच्या अंदाजपत्रकात करण्यात आली असून, साधारणपणे 1 वर्षाच्या कालावधीत सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण होईल.

या नवीन शाळा इमारतीमुळे परिसरातील विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण, दर्जेदार पायाभूत सुविधा आणि सुरक्षित शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार आहे. कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी भौतिक सोयी-सुविधा वाढवण्याचे हे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. पालक, नागरिक आणि समाजातील सर्व स्तरातून या उपक्रमाचे स्वागत करण्यात आले आहे.

**शाळेची नवीन इमारत तळ + ३ मजली असणार असून, यामध्ये १३ वर्ग खोल्या, १ हॉल, १ प्रिन्सिपल रूम, १ ॲडमिन रूम अशा सुविधा उपलब्ध असणार आहेत**

## जे एम एफ शिक्षण संस्थेमध्ये

# नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचे स्वागत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उन्हाळयाच्या सुट्टीनंतर येणारा जून महिना म्हणजे सुखद सरींचा महिना त्यातच शाळा सुरू होणारा शाळेचा पाहिला दिवस म्हणजे आनंदाची पर्वणीच होय. असाव आनंदाचा दिवस घेऊन शाळेच्या पहिल्या दिवशी हजर झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक डॉ राजकुमार कोल्हे, सचिव डॉ प्रेरणा कोल्हे, मुख्याध्यापक व इतर पदाधिकारी यांनी फुलांच्या वर्षावात व पायघड्या घालून सनई चौघडे लावून स्वागत केले. जन गण मन इंग्रजी माध्यमिक शाळा व जन गण मन विद्यामंदिर शाळेतील शिशु विहार ते इयत्ता दहावी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांचे व वंदे मातरम महाविद्यालय विद्यार्थी यांचे जल्लोषात स्वागत झाले. कलात्मक शिक्षिका सपना येन्नम, दीपा तांबे, स्नेहा डोळे व नरेश पिसाट, यांनी सुंदर रीत्या हस्तकलेने स्वागत



कक्ष सजावट केला , व इतर सर्व शिक्षकांनी सहकार्य केले. सर्व छोट्या मोठ्या वर्गातल्या मुलांचे आगमन होताच सर्व शिक्षकांनी टाळया वाजवून फुलांच्या पाकळयांचा वर्षाव करून स्वागत केले तर संस्थेच्या संस्थापिका सचिव डॉ प्रेरणा कोल्हे यांनी मुलांना ओवाळले . त्यावेळी मुख्याध्यापिका, उप मुख्याध्यापिका व सर्वांनी मिळून मुलांना हाताला धरून वर्गात प्रवेश केला.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ राजकुमार कोल्हे यांनी देखील पुष्प वर्षाव करून सर्वांचे स्वागत केले. शाळा हे एक मंदिर आहे आणि हे सर्व विद्यार्थी म्हणजे या मंदिरातील देवता आहेत.विद्येची देवता सरस्वती, बुद्धीचा दाता गणपती बाप्पा अशा या देवतांचे रूप म्हणजे ही छोटी मुले असे उद्गार संस्थापक डॉ राजकुमार कोल्हे यांनी काढले तर उन्हाळयाच्या सुट्टीचा आनंद घेऊन आलेल्या सर्व मुलांनी असाच आनंद उत्साह वर्षभर टिकवून ठेवा असे सांगून 15 जून हा Father's Day वडिल, 12 May Mother's Day व 1 june पालक दिवस पालकांचा दिवस यांची आठवण करून सर्व मुलानी आपल्या आई वडीला साठी Greetings बनविले व Jmf संस्थेने सर्वांना चॉकलेट दिले तर त्यांच्या घरात जेवढे काही सदस्य आहेत तेवढे चॉकलेट विद्यार्थ्यांना दिले. अशा प्रकारे नवीन आगमना सोबत पालक दिवस पण साजरा करण्यात आला.

मुलांच्या चेहऱ्यावरचा ओसंडून वाहणारा आनंद बघून संस्थापिका सचिव डॉ प्रेरणा कोल्हे यांनी देखील मुलांना जवळ घेऊन आलिंगन देऊन त्यांचे स्वागत केले, तुम्हा सर्व मुलांचे आनंदी चेहरे बघून बालपण हे कधीच संपू नये असे वाटते आणि शिक्षण घेऊन मोठे होऊन असेच बाल मनाने आनंदाने जगा असे उद्गार डॉ प्रेरणा कोल्हे यांनी काढले .

जन गण मन इंग्लिश शाळा आणि विद्यामंदिर माध्यमातील सर्व शिक्षक वर्गाने मुलांचे स्वागत करून अध्यापनास सुरुवात केली.

# टोरंट विद्युत कंपनीला ठाणे जिल्ह्यात अन्य पर्याय द्या

## मुंबईच्या धर्तीवर ठाणे जिल्ह्यात विद्युत सुविधेची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /डोंबिवली : मुंबईच्या धर्तीवर भिवंडी सह कल्याण ग्रामीण भागासाठी विद्युत कंपन्यांचा पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. टोरंट कंपनीच्या मनमानी कारभाराविरोधात ग्राहकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. भिवंडीत उसळणारे जनआंदोलन आता कल्याण ग्रामीण भागात देखील उसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबईच्या धर्तीवर भिवंडी सह दिवा आणि अन्य परिसरासाठी अन्य विद्युत कंपन्यांचे पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी मनसेचे माजी आमदार राजू पाटील यांनी राज्यचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

भिवंडी लोकसभेत विद्युत ग्राहकांना हैराण केलेल्या टोरंट कंपनी विरोधात आता कल्याण लोकसभेतील ग्राहक देखील आक्रमक झाले



आहेत. कल्याण लोकसभेतील दिवा विभागासह १४ गावांमध्ये टोरंट कंपनीकडून वीज पुरवठा केला जात आहे. मात्र या कंपनीच्या विरोधात नागरिकांनी आगमनाच्या पहिल्या दिवसापासून विरोध दर्शविला आहे. अवाढव्य देणारे वीजबिल, विद्युत ग्राहकांवर करण्यात येणाऱ्या पोलीस कारवाया यांसह अन्य

**मनसे नेते प्रमोद पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

कंपनीच्या अनागोंदी कारभारामुळे ग्राहक त्रस्त झाले आहेत. कल्याण ग्रामीण भागातील दिवा,कळवा शहरासह परिसराला आणि १४ गावांना अनागोंदी कारभाराचा सर्वाधिक फटका बसू लागला आहे. त्यामुळे या कंपनीला पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. कल्याण ग्रामीण भागात टोरंट कंपनीने प्रवेश केल्यानंतर तत्कालीन आमदार राजू पाटील यांनी विधानसभा निवडणुकीच्या विजयानंतर कंपनीच्या विरोधातील ठाण्यात असलेल्या भूमिपुत्रांच्या आंदोलना सहभाग घेतला होता. पाच वर्षांपासून ठाणे जिल्ह्यात टोरंट कंपनीला पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी मनसे नेते राजू पाटील हे करत आहे. मात्र ठाकरे सरकार नंतर शिंदेच्या सरकारने देखील मनसेची ठाणे जिल्ह्यातील नागरिकांच्या महत्वाची मागणी मान्य केली नव्हती. त्यामुळे आता राज्याचे पालकत्व असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मनसेकडून हि मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे आता विद्युत ग्राहक मनसे नेते राजू पाटील यांच्या मागणीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय निर्णय घेतात याकडे लक्ष देऊन राहिले आहेत.

**विद्युत ग्राहकांना होणारे फायदे :**

- ग्राहकांची समस्यां तातडीने सोडवण्यात येतील.
- कंपन्यांचे प्रत्येकाचे स्वतंत्र युनिट प्रमाणे दर असणार.
- कंपन्यांकडून नागरिकांना योग्य वागणूक दिली जाईल.
- पर्याय उपलब्ध झाल्याने दबाव शाही मधून मुक्तता होणार.

# कडसुरे शाळेत प्रवेशोत्सव पाठ्यपुस्तके वाटप व वृक्षारोपण साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्हा परिषद शाळा कडसुरे केंद्र आमडोशी-रोहा येथे माजी सरपंच राजेंद्र शिंदे यांच्या उपस्थितीत शालेय विद्यार्थ्यांना पुष्प देऊन स्वागत केले, तसेच पाठ्यपुस्तके, गणवेश वाटप करून वृक्षारोपण करण्यात



आले. यावेळी केंद्रप्रमुखा सौ.रंजना पाटील ग्रामपंचायत सदस्या सौ. शिर्के शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निलम शिंदे उपाध्यक्ष डी.एन शिर्के साधन व्यक्ती मनिषा पाटील मुख्याध्यापक भास्कर लेंडी , शाळा व्यवस्थापन समिती माता-पालक संघ, शिक्षक पालक संघ, शिक्षक वर्गआदि मान्यवर उपस्थित होते.

## भिवंडीतील नागरी समस्यांबाबत

# शिवसेना पक्षाच्या वतीने आयुक्तांना निवेदन सादर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहरातील नागरिकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याने करदाते हैराण झाले आहेत त्यामुळे महापालिका आयुक्त प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे आणि करदात्यांना नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात अशी मागणी भिवंडी शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. याबाबत भिवंडी शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख मनोज गगे यांच्या नेतृत्वाखालील सेनेच्या शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त अनमोल सागर यांची सकाळी भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन दिले आहे. यावेळी महिला संघटिका वैशाली मेस्त्री, माजी शहरप्रमुख मोहन वल्लाल, राजा पुण्यार्थी, राम लहारे, नितेश दांडेकर, प्रशांत वसानी, सुधीर



नांदुरडीकर, नितीन काठवले, शंकर खामकर, जमालुद्दीन मोमीन यांच्या सह शिवसैनिक पदाधिकारी उपस्थित होते. शहरातील विविध भागातील रस्त्यांची सिमेंट कॉंक्रीटीकरणाची कामे अत्यंत संथगतीने सुरू असल्याने खोदकाम केलेल्या मार्गावर वाहतूक कोंडी व अपघात होत आहेत. पावसामुळे खोदकाम केलेल्या रस्त्यावर चिखल झाला आहे त्यामुळे प्रवासी व पादचारी नागरिकांना त्याचा मनस्ताप सहन कराव लागत आहे. अनेक ठिकाणी पाण्याच्या पाईपलाईन तुटलेल्या असल्याने त्याचा परिणाम पाणीपुरवठ्यावर झाला आहे. नागरिकांना मुबलक पाणी मिळत नसल्याने महिला वर्ग त्रस्त झाले आहेत.

अनेक भागात ड्रेनेज पाईप लाईन देखील लिकेज आहेत त्यामुळे सांडपाणी रस्त्यावर वाहून दुर्गंधी पसरत आहे. पालिकेचा स्वच्छता विभागाकडून नियमित साफसफाई व जंतुनाशक औषध फवारणी होत नसल्याने ऐन पावसाळयात आजारपण सामना नागरिकांना करावा लागत आहे. कामवारी नदीची प्रदुषण व कचऱ्यामुळे दुरावस्थेत आली, नदीच्य पाण्यावर जलपर्णी जमा झाली आहे. त्यामुळे विसर्जन कार्यात बाधा निर्माण होण्याची शक्यता आहे.नदी पात्रात केमिकलयुक्त पाणी व ड्रेनेजचे पाणी सोडले जात आहे त्यामुळे महापालिका प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे तसेच शहरातील विविध रस्ते सुस्थितीत करून नागरिकांना सुविधा देण्यात याव्यात अशी मागणी यावेळी उपस्थितीत शिवसेना पक्षाचेवतीने करण्यात आली. यावेळी आयुक्तांनी लवकरच सर्व समस्यांचे निराकरण केले जाईल असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

# भिवंडी महापालिकेच्या शिक्षण विभागातर्फे प्रवेशोत्सव संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /भिवंडी : शासन आदेशानुसार भिवंडी शहर महानगर पालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये महापालिका आयुक्त अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.मुसळधार पाऊस पडत असताना सुध्दा शिक्षक,विद्यार्थी व पालक या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापालिकेच्या शाळा क्रमांक 86,45 व 58 मध्ये विद्यार्थी प्रवेशोत्सव कार्यक्रम सोहळा मंगळवारी सकाळी



करण्यात आला. प्रसंगी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त बाळकृष्ण क्षिरसागर, शिक्षण मंडळाचे माजी सभापती सुंदर नाईक, सहाय्यक आयुक्त नितीन पाटील, प्रशासनधिकारी स्नेहल पुण्यार्थी अदि मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**भिवंडी शहरातील प.रा.विद्यालय व पुर्व प्राथमिक विभागाचेवतीने सुध्दा विद्यार्थी पाऊलखुणा प्रवेशोत्सव कार्यक्रम शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या पुढाकाराने करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना पुष्पगुलाब देत जल्लोषात स्वागत करण्यात आले.**

शाळा प्रवेशोत्सव सोहळ्या निमित्त शाळेला सजावट करून आकर्षक रांगोळ्या काढण्यात आले होते.यावेळी नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके,गणवेश, बुट-पायमोजे, गुलाबपुष्प व खाऊ देऊन पाहुण्यांनी स्वागत केले.शाळेच्या पहिल्या दिवसाची सुरुवात म्हणून शाळेतील मुलींच्या हस्ते प्रवेशात्सव कार्यक्रमाची फीत कापण्यात आली. विद्यार्थी व पालकांसह संवाद सभा घेऊन उपस्थितांना अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके व माजी सभापती सुंदर नाईक यांनी मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांतर्फे वृक्षारोपण करुन दत्तक झाड योजना सुरु करण्यात आली.

# राज्यात सुमारे साडे अकरा लाख हेक्टरवर पेरण्या

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यातील विविध भागात मोसमी पाऊस सक्रिय झाला असून आतापर्यंत सुमारे ११.७० लाख हेक्टर शेतजमीनीवर पेरण्या झाल्या आहेत, अशी माहिती राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. पाऊस चांगला झाला असल्याने खतांची मागणी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या खतांची उपलब्धता करुन ठेवा. गरज भासल्यास आणखी मागणी करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील पीक पाणी, खते आणि बियाणे पुरवठा यांच्याबाबत कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की, राज्यातील जवळपास सर्वच भागात मोसमी पाऊस सक्रिय झाला आहे. यंदा आतापर्यंत ११.७० लाख हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. गेल्या वर्षी १४५.८२ लाख हेक्टरवर अंतिम पेरण्या झाल्या होत्या. त्यातुलनेत यंदा सरासरी आठ टक्के पेरण्या झाल्या आहेत. खरीप हंगामातील पूर्वमशागतीची कामे सुरू आहेत. राज्यातील काही भागात सतत पाऊस सुरू असल्याने पेरण्या खोळंबल्या आहेत असे त्यांनी सांगितले.अहिल्यानगर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, सांगली आणि धाराशिव जिल्ह्यात शंभर टक्के हून अधिक पाऊस झाला आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, जळगाव, सातारा, कोल्हापूर, जालना आणि लातूर जिल्ह्यात ७५ ते १०० टक्के पाऊस झाला आहे. ठाणे, रायगड, नाशिक, नांदेड, परभणी, हिंगोली आणि बीड या जिल्ह्यात ५० ते ७५ टक्के पाऊस झाला आहे. पालघर बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात २५ ते ५० टक्के पाऊस झाला आहे. नंदुरबार, वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा जिल्ह्यात २५ टक्के पेक्षा कमी पाऊस झाला आहे. मराठवाडा आणि विदर्भातील भागात येत्या दोन ते चार दिवसांत चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहे असे श्री. रस्तोगी यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील सर्व धरणाच्या जलाशयाच्या पाणीसाठ्यात चांगली वाढ होत आहे, असे जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सांगितले. कर्नाटकातील अलमट्टी धरण प्रकल्पाचे मुख्य अभियंता यांच्याशी संपर्क साधला असून त्यांनी धरणात ५१५ मीटर पर्यंत पाणीसाठा करण्यात येईल असे सांगितल्याची माहिती श्री. कपूर यांनी यावेळी दिली.मंत्रिमंडळाच्या बैठकीपुर्वी अहमदाबाद विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# जिल्ह्यातील आदिवासी बांधवांना सर्व लाभ देणार

## -जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : शहापूर तालुक्यातील शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, दहागाव येथे काल, दि.16 जून 2025 रोजी प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (टप्पा दोन) चे उद्घाटन शहापूरचे आमदार तथा महाराष्ट्र राज्य अनुसूचित कल्याण समितीचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) दौलत दरोडा यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, आदिवासी विकास विभागाचे उपसचिव रवींद्र जाधव, प्रांताधिकारी अमित सानप, ज्योती कांबळे, तहसिलदार परमेश्वर कासुळे, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी राजेंद्रकुमार हिवाळे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी




जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी जिल्ह्यातील सर्व आदिवासी बांधवांना धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत सर्व लाभ देण्यात येणार असल्याचे सांगितले.

या टप्प्यात दि.16 जून ते 30 जूनपर्यंत जिल्ह्यातील पाचही तालुक्यांमध्ये 146 गावातील आदिवासी लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी 45 ठिकाणी शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सर्व पात्र लाभार्थ्यांनी या शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने न्युक्लियस बजेट अंतर्गत लाभ देण्यात आलेल्या बचतगटांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरणही करण्यात आले.शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, दहागाव येथे ठिकाणी शैक्षणिक वर्ष 2025-26 च्या शालेय प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत राघोजी भांगरे गुणगौरव पुरस्कार मागील वर्षी इयत्ता दहावीमध्ये प्रथम आलेले तीन विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नवीन प्रवेशीत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच या वर्षाचे शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय शहापूरचे प्रकल्प अधिकारी राजेंद्रकुमार हिवाळे यांनी केले. तसेच 16 जून ते 30 जूनपर्यंत जिल्हाभरातील शिबिरांमध्ये जास्तीत जास्त आदिवासी बांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

# कल्याणमध्ये जागतिक घरेलू कामगार दिनानिमित्त मानवी साखळी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : जागतिक घरेलू कामगार दिनानिमित्त देश भरातील घरेलू कामगारांसाठी कायदा व्हावा, या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे घरेलू कामगार महिलांनी कल्याणमध्ये मानवी साखळीद्वारे स्वागत केले. कल्याण पश्चिमेतील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाजवळ हि मानवी साखळी करण्यात आली.

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने, 16 जून हा जागतिक घरकामगार दिन म्हणून घोषित केला आहे. ४ मार्च जागतिक महिला दिना प्रमाणे 16 जून हा जागतिक घर कामगार दिन घरकामगार महिला देशभर साजरा करतात. सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील घर कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा देणारा कायदा व्हावा असा निवाडा दिला आहे. या निवाड्याने घरकामगार महीलांमध्ये प्रचंड आनंदाचे वातावरण पसरले आहे. या आनंदी निवाड्याचे स्वागत देशभरातील घरकामगार महीलांना पुष्प देवून सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानण्यात आले.त्याच प्रमाणे कल्याण परीसरातील सुमारे ३०० घरकामगार महीलांनी जागतिक घरकामगार दिन शुभेच्छा संदेश मानवी साखळी द्वारे सर्वोच्च न्यायालयाचे आभार व्यक्त करत या जागतिक घरकामगार दिनाचा संदेश जनतेत पोहचविला. यावेळी लक्ष्मी नाईक, पुष्कराज शीरधनकर, वैशाली कांबळे, मीरा सपकाळे, भावना वाघमारे, प्रणाली जाधव, ज्ञानेश पाटील आदी पदाधिकाऱ्यांसह महाराष्ट्र राज्य घरेलू कामगार समन्वय समितीचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.



# विजय जोशी यांच्या मराठी कवितेचा ५६ भाषांमध्ये अनुवादाचा जागतिक विक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / डोंबिवली : कवी गझलकार गीतकार समीक्षक विजो (विजय जोशी) डोंबिवली यांच्या 'बाया' या मराठी कवितेचा ५६ भाषांमध्ये अनुवादाचा जागतिक विक्रम झाला आहे. डोंबिवली येथे वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडिया चे प्रतिनिधी चीफ एडिटर सुष्मा नार्वेकर आणि मार्केटिंग हेड संजय नार्वेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन कवी विजो यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित अनुवादकांनाही सन्मानित करण्यात आले. या ५६ अनुवादित भाषांमध्ये ३४ बोलीभाषा, १५ प्रादेशिक भाषा, ७ जागतीक भाषा आहेत. (यामध्ये मोडी आणि ब्राम्ही लिपी यांचाही समावेश आहे हेही विशेष). अजूनही इतर भाषांमध्ये अनुवाद येत आहेत.मराठी भाषा अभिजात म्हणून घोषित झाली असतानाच एखाद्या मराठी कवितेला एवढ्या मोठ्या संख्येने अनुवादाच्या सहाय्याने जागतिक पटलावर पोहोचविण्याचे महत्वाचे काम झाले आहे याबद्दल वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडियाच्या प्रतिनिधींनी कौतुक केले.



# योग ही काळाची गरज - डॉ.विजय कुकरेजा


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : आपल्या अलीकडच्या दैनंदिन जीवनामध्ये धावपळ ताण-तणाव मानसिक थकवा या गोष्टी अपरिहार्य झाले आहेत आणि अशा या सर्व परिस्थिती मधून जर कुठला मार्ग आपल्याला मनशांती आरोग्य आणि स्थैर्य देत असेल तर तो म्हणजे योग योगामुळे ना केवळ आपले शारीरिक स्वास्थ्य सुधारतं तर मानसिक स्वास्थ देखील उत्तम राहतं मानसिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी खूप मोठी मदत मिळते आणि म्हणूनच राष्ट्रीय सेवा योजना उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिवस कार्यक्रम जीवनदीप कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली येथे दिनांक 15 जून 2025 रोजी पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आरोग्य योगा आणि नॅचरोपॅथी इन्स्टिट्यूट चे संस्थापक डॉ. विजय कुकरेजा उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनात योगाच्या माध्यमातून नकारात्मक गोष्टींचा नाश करून सकारात्मक प्रवृत्तीकडे वळण्यास प्रोत्साहित करत विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व आणि फायदे पटवून दिले. तसेच संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांनी देखील विद्यार्थ्यांना आरोग्य निरोगी करण्यासाठी योगाचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रम मध्ये १६ जून ते २१ जून २०२५ पर्यंत मोफत योग सत्रे घेतली जाणार आहेत. त्यानंतर जीवनदीप महाविद्यालयामध्ये नव्याने सुरू होत असलेल्या M.A. योगशास्त्र या अभ्यासक्रमाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. आणि विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक रित्या योग करून घेण्यात आले.





या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीश लकडे यांनी केले. यावेळेस नॅचरोपॅथी इन्स्टिट्यूट च्या समन्वयक सारिका कुकरेजा, अन्नपूर्ण राव ,स्वाती पालव, योगा एक्सपर्ट सायली जाधव प्रणाली पाटील जयश्री आंबेकर, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक वाघ,विधी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ.जयकुमार रिजवानी उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे , कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश रोहणे, निर्मल स्कूलच्या मुख्याध्यापिका भावना कुंभार राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख दिनेश धनगर, गावातील काही ग्रामस्थ महाविद्यालयाचे शिक्षक वृंद आणि विद्यार्थ्यांच्या समवेत हा कार्यक्रम संपन्न झाला.




# जिल्ह्यातील निराधार बालकांकरीता 'साथी' मोहिमेचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल यांच्या मार्गदशनाखाली ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील निराधार मुलांकरिता District SAATHI Committee "Survey for Aadhaar and Access to Tracking & Holistic Inclution" अन्वये दि.16 मे 2025 रोजी "जिल्हा साथी समिती"चे गठण करण्यात आले.

ही साथी मोहीम दि.13 मे ते दि.15 ऑगस्ट 2025 या कालावधीत कामकाज करणार आहे. समितीद्वारे जिल्ह्यातील दुर्लक्षित, बेघर, अनाथ किंवा रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे सर्वेक्षण करुन त्यांना आधार नोंदणीद्वारे अधिकृत ओळख प्रदान करण्यासाठी ही मोहीम सुरु करण्यात आली आहे. तसेच मोहिमेमार्फत केवळ निराधार मुलांची ओळख निर्माण न करता त्यांना शैक्षणिक, आरोग्य, निवारा तसेच कायदेशीर संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक सेवा उपलब्ध करुन दिली जाणार आहे. तसेच मोहीम "बालहित सर्वोपरी" या तत्त्वावर आधारित असून बालकांचे सर्वांगीण पुनर्वसन आणि विकास हे तिचे मुख्य उद्दिष्ट आहे. या प्रक्रियेमध्ये विधी सेवा यंत्रणा, स्थानिक प्रशासन, पोलीस विभाग, सामाजिक संख्या आणि बालकल्याण समित्या एकत्रितपणे काम करणार आहेत, अशी माहिती सचिव ईश्वर सुर्यवंशी यांनी दिली.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे प्रभारी सचिव श्री.एस.बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे जिल्ह्याकरिता गठीत जिल्हा साथी समितीची प्रथम बैठक दि.22 मे 2025 रोजी घेण्यात आली. या समितीमध्ये जिल्हा शिक्षणाधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, तहसिलदार, बाल संरक्षण अधिकारी, पोलीस अधिकारी, बालगृह/निवारागृह/अनाथाश्रम इत्यादी शासकीय/अशासकीय संस्था प्रतिनिधींचा समावेश असून निराधार बालकांना कायदेशीर ओळख मिळवून देण्याकरिता पॅनल विधीज्ञ तसेच विधी स्वयंसेवक यांची उपस्थिती होती. या बैठकीमध्ये प्रभारी सचिव यांनी सर्व उपस्थित सदस्यांना मोहिमेची सविस्तर माहिती देवून मोहीम यशस्वीततेकरिता सर्व सदस्यांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव ईश्वर सुर्यवंशी यांनी केले.

मोहिमेचा उद्देश:

18 वर्षांखालील मुले ज्यांना कौटुंबिक आधार, पालकत्व किंवा निवारा, संरक्षण आणि काळजीचे स्थिर स्त्रोत नाही असे. तसेच रस्त्यावर राहणारी मुले, झोपडपट्ट्यांमध्ये किंवा रेल्वे स्थानकांवर राहणारी मुले, बाल संगोपन संस्थांमध्ये राहणारी अनाथ मुले, बेबंद मुले तस्करीतून सुटका झालेली बालके, निवारागृहे किंवा नोंदणी नसलेली बाल संगोपन गृहे आणि कुटुंबाला परत मिळाली नाहीत, अशा सर्व मुलांची ओळख आणि सन्मानासाठी साथी मोहिमेचे उद्दिष्ट आहे.

# मराठी ख्रिस्ती धर्मगुरुंना संविधान भेट

## सामाजिक एकतेचा अनोखा उपक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : गॉस्पल व्हिजन चर्च, कल्याण येथे मराठी ख्रिस्ती समाजाच्या सशक्तीकरणासाठी आयोजित कार्यक्रमात राज्यभरातून आलेल्या ख्रिस्ती धर्मगुरू आणि सेवक यांना भारताचे संविधान विशेष भेट म्हणून प्रदान करण्यात आले. ही संविधान भेट मराठी ख्रिस्ती सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विशाल दामले यांच्या हस्ते देण्यात आली.

या उपक्रमाचा उद्देश धर्मगुरू आणि सेवकांना भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि धर्मनिरपेक्ष मूल्ये याबद्दल सजग करणे हा होता. दामले म्हणाले, "आपण ख्रिस्ती असूनही या देशाचे जबाबदार नागरिक आहोत. संविधान हेच आपले सामर्थ्य आहे. हे पुस्तक प्रत्येक धर्मगुरूच्या हातात असणे आवश्यक आहे." कार्यक्रमात विविध चर्चमधून आलेल्या पास्टर, प्रचारक व सेवक यांचा सहभाग होता. उपस्थितांना संविधानाबद्दल माहिती देणारे सत्रही आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व धर्मगुरूंनी सामाजिक सलोखा व न्यायासाठी एकत्र येण्याचा संकल्प केला.



# मुरबाड जिल्हा परिषदेच्या नं-२ शाळेत प्रवेशोत्सव साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड शहरालगत खाजगी शाळांचं जाळं असतांनाही जिल्हा परिषदेच्या मुरबाड नं-२ शाळेत पहिल्याच दिवशी दि.१६ सप्टेंबर रोजी चाळीस मुलांचा प्रवेशोत्स्व साजरा झाला. पावसाची संततधार असतांनाही अतिशय उत्साहात, आनंदाने वाजतगाजत, नियोजनबद्ध प्रवेशोत्सव झाला.प्रवेशद्वारावरील आकर्षक सजावट, रांगोळी सर्वांचे लक्षवेधक ठरली. यावेळीच प्रत्येक प्रवेशपात्र विद्यार्थ्यांस गुलाबपुष्प , पाठ्यपुस्तके लाडू ,चॉकलेट इ.वाटप करण्यात आले. पावलांचे ठसे घेऊन, सेल्फी पॉइंटचे फोटो काढण्यात आले. विश्वासास पात्र ठरत असलेल्या शाळेचा पट हा आजही ५०० पेक्षा जास्त टिकून आहे.

येथील बहुजन समाजातील सर्वाधिक मुले मोफत व उपक्रमशील शिक्षकांमुळे दर्जेदार शिक्षण घेताहेत याबाबत ठाणे जिल्हा परिषदेचे उपअभियंता मा.संजय सुकटे यांनी शाळेच्या व्यवस्थापनाबाबत गौरवोद्गार काढले. सदर कार्यक्रमास सर्व शिक्षा अभियान मुरबाडचे विषयतज्ज्ञ राजेश वेखंडे सर,मुख्याध्यापक चिंतामण गवारी सर,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शाळेतील सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.



# जि.प. शाळा सारमाळ शिंगे पाडा येथे विद्यार्थ्यांचे स्वागत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील) : वासिंद जवळील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंगेपाडा (सारमाळ ) येथे दाखल पात्र मुलांचे पहिल्या दिवशी स्वागत करण्यात आले.

शाळा प्रवेशोत्सव सर्वत्र पार पडला असून येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंगेपाडा (सारमाळ ) या शाळेतील मुलांना फेटे बांधून व फुगे देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. सदर, या कार्यक्रम प्रसंगी सारमाळ ग्रामपंचायत सरपंच अपर्णा शिंगे व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा नीलम वाख आदी ग्रामस्थ व पालक उपस्थित होते.

सदर, विद्यार्थ्यांना दुपारच्या जेवणामध्ये गोड म्हणून बुंदीचे वाटप करण्यात आले तसेच सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व मोफत पाठ्यपुस्तक वाटप करुन हा शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला असल्याचे शाळेचे मुख्याध्यापक अनिल पडवळ यांनी म्हटले. तर शाळेतील सहशिक्षिका नीलम भोईर यांनी सर्व उपस्थित पाहुणे, ग्रामस्थ, पालक व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

# सिद्धगडावरच्या दरीत पडलेल्या पर्यटकाचा मृतदेह तीन दिवसानंतर बाहेर काढण्यात रेस्क्यू टीमला यश!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील सिद्धगडावर मुंबई येथील... ट्रेक ग्रुप मधील एक व्यक्ती मिसिंग आहे.

मिसिंग झालेल्या तरुणाचे नाव साईराज धनंजय चव्हाण, वय -२२वर्षे, रा. नवी मुंबई, या तरुणाचा मृतदेह अखेर तीन दिवसांनी ३०० फूट खोल दरीतून बाहेर काढण्यात रेस्क्यू टीमला यश आले आहे .

१८ पर्यटक फिरण्यासाठी रविवारी आले होते.त्यातील साईनाथ चव्हाण वय २२ नवीमुंबई येथे राहणारा तरूण (पर्यटक) गडावर मिसींग झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती ,, त्यानंतर मुरबाड पोलिस तसेच स्थानिक ग्रामस्थ युद्ध पातळीवर शोध घेत होते. परंतु सोमवारी पूर्ण दिवस पाऊस पडत असल्याने रेस्क्यू टीमला मृतदेह बाहेर काढताना अडचण येत होती त्यानंतर अंधार पडला होता, मग रेस्क्यू टीमने मंगळवारी सकाळपासून मृतदेह बाहेर काढण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. प्रयत्नांना यश आले त्यांनी मंगळवारी दुपारी ३००फूट खोल दरीतून मृतदेह बाहेर काढण्यात रेस्क्यू टीमला यश आले आहे.

याकामी रेस्क्यू ऑपरेशन साठी शहापूर, खोपोली, मुरबाड येथील गिर्यारोहक यांनी मदत केलेली आहे. तरीही पावसाळयात पर्यटकांनी कोणत्याही गडावर जाऊ नये व आपला जीव धोक्यात घालून नाही असे आवाहन मुरबाड तहसीलदार अभिजीत देशमुख यांनी केले आहे.



# कुंभारशिव येथील अनधिकृत बांधकाम महसूल विभागाकडून निष्कासित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील राहुर ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या कुंभारशिव येथील सरकारी जमीनीवर केलेले अनधिकृत बांधकाम महसुल विभागाकडून निष्कासित करण्यात आल्याने अनधिकृत बांधकाम करणाऱ्या भुमाफीयांचे धाबे दणाणले आहेत.

कुंभारशिव हद्दीत महसुल विभागाच्या सरकारी जमीनीवर ७ ठिकाणी भुमाफीयांनी अनधिकृत गोदाम, फार्म हाऊस, पत्राशेड, संरक्षित भिंतीचे मोठ्या प्रमाणात बांधकाम केले होते त्याबाबत महसूल विभागाकडे तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्यानुसार सोमवारी भिवंडी तहसीलदार अभिजीत खोले यांच्या आदेशानुसार पडघा मंडळ अधीकारी संतोष आगीवले यांच्या नेतृत्वाखालील तलाठी विजय लोहकरे, गणेश पाटील, संजीव धात्रक महसूल सहाय्यक महेश थोरात, जयंत गायकवाड, टोरेंट पॉवर कंपनी कर्मचारी यांच्या उपस्थितीत सात ठिकाणी केलेली अनधिकृत बांधकामे दोन जेसीबीच्या सहाय्याने जमीनदोस्त करण्यात आले. त्यामुळे राहुर ग्रामपंचायतीच्या हद्दीत सरकारी जागेवर अतिक्रमण करणाऱ्या भुमाफीयांचे धाबे दणाणले आहेत यापूर्वी सुध्दा राहुर ग्रामपंचायतीच्या हद्दीत आदीवांसीच्या जमीनीवर अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकाम केलेले बंगले, फार्महाऊस श्रमजीवी संघटनेचे संस्थापक विवेक पंडित यांच्या पाठपुराव्यामुळे महसूल विभागाने जमीनदोस्त करुन आदीवांसीच्या नावावर असलेल्या जमीन त्यांना परत दिल्या होत्या तर राहुर ग्रामपंचायतीच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे होत आहेत सदर अनधिकृत बांधकामे निष्कासित करणे हे स्थानिक ग्रामपंचायतीचे काम असताना या अनधिकृत बांधकामांना अभय कोण देत आहे. तसेच अनधिकृत बांधकामांना विज व इतर सुविधा कशा काय मिळतात. तसेच सरकारी जमीनीवर अनधिकृत बांधकामे कोणत्या सरपंच, ग्रामपंचायत कमीटी, ग्रामपंचायत अधीकारी यांच्या कार्यकाळात होतात. त्यांचा शोध घेऊन महसूल विभागाने त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी मागणी नागरिकांकडुन होत आहे.



नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# जिल्हा परिषद शाळा शिक्षणाबरोबर संस्कार शिकवतात - नायब तहसीलदार तुषार कामत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : जिल्हा परिषद शाळा या फक्त शिक्षणच देत नाहीत तर संस्कारही शिकवतात, मी स्वतः नगरपालिकेच्या शाळेमध्ये शिक्षण घेतलेले आहे असे मार्गदर्शन करताना नायब तहसीलदार तुषार कामत यांनी मायानी कोयना या शाळेत बोलताना सांगितले.

पुढे म्हणाले की, सर्व मुलांचे हसरे चेहरे बघितल्यावर मला समाधान वाटले. एक काळ असाही होता की पहिलीमध्ये दाखल होणारी काही मुले सुरुवातीला काही काळ रडतच शाळेत यायची,पण आता मात्र सर्वच विद्यार्थी हसत शाळेत येतात. नवीन दाखल पात्र विद्यार्थ्यांचे या ठिकाणी गुलाब पुष्प देऊन स्वागत होत आहे यामुळे या लहान बालकांच्या मनावर एक चांगला सकारात्मक परिणाम होतो. आपणही या ठिकाणी खास आहोत आणि आपलीही दखल घेतली जात आहे. त्यामुळे या मुलांच्या मनामध्ये एक आत्मविश्वास निर्माण होतो. हाच आत्मविश्वास त्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवासामध्ये प्रेरणा देण्याचे काम करेल.यावेळी एक पाऊल शिक्षणाचे कायमस्वरूपी स्मरणात राहावे म्हणून मुलांच्या पावलांचे ठसे कागदावर उमटवण्यात आले. तसेच एक पेड मा के नाम अभियानांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.

पेण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मायणी कोयना या शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात इयत्ता पहिलीमध्ये दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशोत्सवाने झाली. दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत नायब तहसीलदार तुषार कामत यांनी केले. दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांसह सर्व विद्यार्थ्यांची यावेळी गावातून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश, बूट व सॉक्स तसेच नायब तहसीलदार तुषार कामत यांनी स्वतः आणलेल्या गोड खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर अमित महागावकर अंजलीताई पवार गिरीश म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.









'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024